<u>नियमित दिवाणी दावा क्र.१४७/२०१६ मधील निशाणी क्र.१११ वरील आदेश</u>

(माधव व इतर वि महानंदा व इतर)

(CNR NO.MHLA060003192016 )

सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.४ यांनी दिनांक ०२.०३.२०१९ रोजी निशाणी क्र.१ वर त्यांच्याविरूध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द होण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्ज, त्यावरील वादी यांचे म्हणणे व दाव्याच्या संपुर्ण अभिलेखाचे अवलोकन केले.

३. प्रतिवादी यांचे अर्जातील कथन खालीलप्रमाणे;

प्रतिवादी क्र.४ हे पुणे येथे वास्तव्यास आहेत. वादीने सदर प्रकरण दाखल करतेवेळी प्रतिवादी क्र.४ यांचा चुकीचा पत्ता दिलेला असल्यामुळे प्रतिवादी क्र.४ यांना दाव्याचे समन्स मिळालेले नाहीत. प्रतिवादी क्र.४ विरूध्द पेपरमध्ये जाहिर समन्स काढण्यात आले होते. परंतु त्याची माहिती प्रतिवादी क्र.४ यांना झालेली नाही. प्रतिवादी क्र.४ हे दाव्यात हजर राहू शकले नसल्यामुळे न्यायालयाने दिनांक ०२.०३.२०१९ रोजी त्यांच्याविरूध्द एकतर्फा दावा चालवण्याचा आदेश परित केलेला आहे. प्रतिवादी क्र.४ हे जाणिवपुर्वक किंवा मुद्दामहुम गैरहजर राहिलेले नाहीत. सदर दाव्याची प्रतिवादी क्र.४ यांना योग्य माहिती न मिळाल्यामुळे ते दाव्यामध्ये वेळेत हजर राहून त्यांचे म्हणणे मांडू शकले नाहीत. दावा हा जंगम मालमत्ते संदर्भात असल्याने त्यामधे त्यांचे महत्वपुर्ण अधिकार गुंतलेले आहेत. सबब, त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

४. वादी यांनी असा प्रतिवाद केला की, प्रतिवादी क्र.४ यांनी दिलेला अर्ज व त्यामधे नमूद केलेला मजकुर पुर्णपणे खोटा आहे. निशाणी ४३ वर दिनांक ०१. १२.२०१८ रोजी दैनिक लोकमतमध्ये पान नं.४ वर कोर्टाच्या आदेशानुसार जाहिर समन्स काढण्यात आलेले आहे. त्यानंतर वादीने प्रतिवादी क्र.४ यांच्याकडील महत्वाचे दस्तऐवज दाखल करण्याकरीता निशाणी १०० नुसार लातूर येथील पत्यावर नोटीस काढलेली आहे. ती त्यांना मिळालेली आहे. म्हणून प्रतिवादी यांनी नमूद केलेला मजकुर खोटा आहे. दिनांक १०.१२.२०१८ पासून ते दिनांक ३०.०७.२०२६ पर्यंतचा कालखंड ७ वर्षे, ७ महिने, २१ दिवस इतका आहे. पेपरमध्ये समन्स जाहिर

करून तसेच वेळोवेळी प्रतिवादीच्या नावे समन्स काढून देखील प्रतिवादी क्र.४ कोर्टात हजर राहिलेले नसल्यामुळे त्यांच्याविरूध्द दिनांक ०२.०३.२०१९ रोजी एकतर्फा आदेश पारित केलेला आहे. प्रतिवादी क्र.४ यांचा मुळ पत्ता लातूर येथील आहे व त्या पत्त्यावर त्यांना समन्स प्राप्त झालेले आहे. ते पुणे येथे राहतात हा मजकुर खोटा नमूद केला आहे. त्यामुळे त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

५. प्रतिवादी क्र.४ यांचा अभिलेखावर दाखल खरेदीखत डेबुक क्र. १५७२/१९९५ मध्ये पत्ता वांजरवाडा, ता.अहमदपूर असा नमूद आहे. तोच पत्ता दाव्यात नमूद आहे. बेलीफ अहवाल निशाणी ३० नुसार प्रतिवादी क्र.४ हे वांजरवाडा येथे वास्तव्यास नसून ते राजीव गांधी चौकाच्या बाजुला जुना औसा रोड, लातूर येथे कायमचे वास्तव्यास होते. त्यानंतर प्रतिवादी क्र.४ यांना पेपरद्वारे समन्स बजावणीकरीता अर्ज निशाणी ३९ वादीतर्फे देण्यात आला. त्यामध्ये प्रतिवादी क्र. ४ यांच्या सर्व नातेवाईकांकडे वादी यांनी चौकशी केली असता त्यांना पत्ता मिळू शकला नसल्याचे नमूद आहे. सबब, प्रतिवादी क्र.४ यांना पेपर निशाणी ४३ द्वारे समन्सची बजावणी करण्याचा अर्ज निशाणी ३९ मंजूर करण्यात आला. त्याप्रमाणे दैनिक लोकमत, औरंगाबाद आवृत्तीमध्ये प्रतिवादी क्र.४ चे समन्स प्रसिध्द करण्यात आले व त्यानंतर प्रतिवादी क्र.४ विरूध्द दिनांक ०२.०३.२०१९ रोजी निशाणी १ वर एकतर्फा आदेश पारित करण्यात आला. सदर सर्व प्रक्रिया विचारात घेता प्रतिवादी क्र.४ यांच्यावर दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ५ नियम २०(१)(अ) कायदेशीर मार्गाने समन्सची बजावणी झालेली आहे. तसेच प्रतिवादी क्र.४ यांना निशाणी १०४ कडे लातूर येथील पत्यावर पुन्हा दिनांक २०.०४.२०२६ रोजी अर्ज निशाणी क्र. १०० वरील आदेशान्वये खरेदीखत हजर करण्याकरीता नोटीस बजावणी झालेली आहे. सदरची नोटीस बजावणी झाल्यानंतर प्रतिवादी क्र.४ यांनी त्या नोटीसची पुर्तता केलेली नाही व त्यांनी दाव्यात हजर होवून प्रस्तुतच्या अर्जाद्वारे तो पत्ता खोटा असल्याचे कथन केले आहे. ज्यावरून प्रतिवादी क्र.४ यांना दाव्याचे समन्स मिळालेले नाही हे जे कथन केले आहे ते विश्वासार्ह वाटत नाही. तसेच प्रतिवादी यांनी वादीने अर्जात नमूद केलेला त्यांचा पत्ता खोटा असल्यामुळे दावा दिवाणी प्रक्रिया सांहिता आदेश ६ नियम १४ अ पोट नियम ५ अ अन्वये दावा स्थगित करण्याची मागणी केलेली नाही. त्यामुळे देखील अर्जात नमूद कारण

समर्थनीय वाटत नाही.

**६.** दाव्यामध्ये वादीच्या दोन साक्षीदारांचा पुरावा पुर्ण झालेला असून वादीने तिस—या साक्षीदाराचे पुराव्याचे शपथपत्र सादर केलेले आहे व दावा वादीच्या साक्षीदार क्र.३ च्या उलटतपासाकरीता प्रलंबीत आहे. प्रतिवादी क्र.४ ने अर्जात त्यांचा दाव्यात नमुद पत्ता चुकीचा आहे यापलीकडे त्यांच्याकडून झालेल्या कसुरीबाबत कोणतेही कारण दिलेले नाही. दावा १० वर्ष जुना आहे. दाव्यातील प्रतिवादी क्र.१ व ३ हे वयोवृध्द आहेत. प्रतिवादी क्र.४ ने अर्जात नमूद केलेले कारण विश्वासार्ह नसल्याने तसेच दाव्याचे वय व प्रतिवादी क्र.१ व ३ यांचे वय लक्षात घेता अर्ज नामंजूर करण्यास पात्र आहे. सबब, पुढीलप्रमाणे आदेश;

**<u>आदेश</u>**

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

WADGAONKAR SWANANDI DEVIDAS

Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS
Date: 2026.08.06 17:56:43 +0530

दि.०६.०८.२०२६.

**(स्वानंदी दे. वडगांवकर)**

सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,

अहमदपूर, जि.लातूर.